बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२२
आरक्षण सोडत काढण्याबाबतचा कार्यक्रम.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.-रानिआ/मनपा-२०२२/प्र.क्र.२६/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २३ मे, २०२२

निवडणूक प्राथम्य

प्रति,
आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका.

विषय :- बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२२
आरक्षण सोडतीचा कार्यक्रम.

संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/मनपा-२०२२/प्र.क्र.१३/का.५,
दि.१०/५/२०२२ चे आदेश.

महोदय,

मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (सिव्हील) १९७५६/२०२१ मध्ये दि. ४ मे, २०२२ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिकांची अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यासंदर्भात कार्यक्रम दिला होता. त्यास अनुसरुन सदर बृहन्मुंबई महानगरपालिकेची अंतिम प्रभाग रचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर आदेशात असेही नमूद केले आहे की, जोपर्यंत राज्य शासन त्रिस्तरीय चाचणी पूर्ण करीत नाही, तोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवता येणार नाहीत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेची प्रभाग रचना पूर्ण झाली असून आता कायद्यातील तरतुदीनुसार तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशातील निर्णयानुसार आरक्षण ठरविण्याचा कार्यक्रम देणे आवश्यक आहे.

४. आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याच्या प्रयोजनार्थ सन २०२२ मध्ये होणारी निवडणूक ही बृहन्मुंबई महानगरपालिकेची चौथी सार्वत्रिक निवडणूक असून आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता आरक्षण सोडत काढण्याकरिता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

## आदेश

१. आरक्षण सोडतीचा कार्यक्रम परिशिष्ट-अ मध्ये नमूद करण्यात आला आहे. त्यानुसार अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला व सर्वसाधारण महिला यांच्याकरिता आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता सोडतीचा कार्यक्रम राबविण्यात यावा.

२. राज्य निवडणूक आयोगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेबाबत दि. २९ डिसेंबर, २०२१ रोजी प्रभाग रचनेबाबत सविस्तर आदेश निर्गमित केले आहेत. तसेच दि. २७ जानेवारी, २०२२ च्या आदेशान्वये प्रथम प्रभागांच्या भौगोलिक सीमा निश्चित करुन त्यानंतर आरक्षण निश्चिती करण्यासंदर्भात योग्य ती सुधारणा करण्यात आली आहे.

३. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने दि. २९ डिसेंबर, २०२१ च्या आदेशातील मुद्दा क्र. ११ व १२ नुसार आरक्षण चक्रानुक्रमे फिरवून सोडत काढण्याबाबत उचित कार्यवाही करावी. सदर कार्यक्रमानुसार प्रभागनिहाय आरक्षण सोबतच्या परिशिष्ट-ब नुसार प्रसिध्द करावे.

४. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करण्यासाठी अंतिम प्रभाग रचनेनुसार अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीचा उतरता क्रम तसेच आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याचे तत्व विचारात घेणे आवश्यक असून राज्य निवडणूक आयोगाकडून त्यानुसार आरक्षणास मंजुरी देण्यात येत आहे.

५. राज्य निवडणूक आयोगाच्या दि. २९ डिसेंबर, २०२१ च्या आदेशातील परिशिष्ट - १५ नुसार सोडत काढण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली आहेत. त्यानुसार सोडत काढण्याकरिता योग्य ती उपाययोजना महानगरपालिका आयुक्त यांनी करावी.

६. वरील सूचनांनुसार प्रभागांमधील आरक्षित जागा निश्चित करुन सोडतीचा निकाल विहित नमुन्यांमध्ये राज्य निवडणूक आयोगास तात्काळ पाठविण्यात यावा.

७. सोडतीनंतर सोडतीचा निकाल महानगरपालिकेची वेबसाईट, सूचना फलक व वर्तमानपत्र इ. ठिकाणी प्रसिध्द करावा. त्यावर हरकती व सूचना मागविण्याकरिता किमान दोन वर्तमानपत्रात जाहीर सूचना प्रसिध्द करावी.

८. सोडत काढून त्याची प्रसिध्दी करणे व विहीत कालावधीत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार करुन आरक्षण अंतिमरित्या अधिसूचित करण्याचे अधिकार याद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत. त्यानुसार त्यांनी

सोबतच्या परिशिष्ट-क मधील अधिसूचनेच्या नमुन्यात प्रभागनिहाय आरक्षण अंतिमरित्या प्रसिध्द करावे.

५. वरील कार्यक्रमानुसार प्रत्येक टप्प्यावरील अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा. तसेच सोडतीची सूचना, सोडतीचा निकाल आणि अंतिम आरक्षण अधिसूचना इ. महानगरपालिकेच्या संकेतस्थळ व सूचना फलक इ. ठिकाणी वेळोवेळी प्रदर्शित करुन त्याची योग्य ती प्रसिध्दी करावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# परिशिष्ट-अ

या कार्यालयाचे क्र.रानिआ/मनपा-२०२२/प्र.क्र.२६/का.५, दि.२३/०५/२०२२ सोबतचे सहपत्र.

बृहन्मुंबई महानगरपालिका आरक्षण व सोडत कार्यक्रम-२०२२

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांच्याकरिता आरक्षण चक्रानमुक्रमे फिरवून आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता सोडत काढण्यासाठी- **सोबतच्या परिशिष्ट-ड (मराठी) व परिशिष्ट-इ (इंग्रजी)मधील नमुन्यात जाहीर नोटीस प्रसिध्द करणे.** (त्याची स्थानिक वर्तमानपत्र, वेबसाईट, सूचना फलक इ. वर प्रसिध्दी द्यावी.) | २७/०५/२०२२ (शुक्रवार) |
| २ | अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांच्याकरिता आरक्षण चक्रानमुक्रमे फिरवून आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता - **सोडत काढणे** | ३१/०५/२०२२ (मंगळवार) |
| ३ | सोडतीनंतर **प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करणे** (त्याची स्थानिक वर्तमानपत्र, वेबसाईट, सूचना फलक इ. वर प्रसिध्दी द्यावी.) | ०१/०६/२०२२ (बुधवार) |
| ४ | प्रभागनिहाय आरक्षण निश्चितीबाबत हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | ०१/०६/२०२२ (बुधवार) ते ०६/०६/२०२२ (सोमवार) |
| ५ | आरक्षण निश्चितीबाबत प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांवर विचार करुन **प्रभागनिहाय अंतिम आरक्षण सोबतच्या परिशिष्ट-क मधील नमुन्यात शासन राजपत्रात प्रसिध्द करणे** | १३/०६/२०२२ (सोमवार) |

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# परिशिष्ट-ब

या कार्यालयाचे क्र.रानिआ/मनपा-२०२२/प्र.क्र.२६/का.५ दि.२३/०५/२०२२ सोबतचे सहपत्र.

## बृहन्मुंबई महानगरपालिका प्रारुप / अंतिम प्रभागनिहाय आरक्षण.

बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक- २०२२ करिता क्रमांक ---------- दि. --------- अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अंतिम प्रभाग रचनेमधील प्रत्येक प्रभागनिहाय आरक्षण खालीलप्रमाणे राहील :-

### एकूण जागांचा तपशील.

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी महिलांकरिता आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | | |
| २ | अनुसूचित जमाती | | |
| ३ | सर्वसाधारण | | |
| एकूण | | | |

### प्रभागनिहाय आरक्षणाचा तपशील.

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | आरक्षण |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

महानगरपालिका आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका.

# परिशिष्ट- क

## अधिसूचना

क्रमांक .................. ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाने दि. १० मे, २०२२ रोजी दिलेल्या कार्यक्रमानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीकरिता प्रभागांच्या अंतिम भौगोलिक सीमा क्र. ................., दि. .......... च्या अधिसूचनेअन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाने क्र. .......... दि. ....... च्या पत्रान्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या आरक्षणास मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाने क्र. ............ दि. ............ च्या आदेशान्वये आरक्षण सोडत काढून त्याची अंतिमरित्या प्रसिध्दी करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान केले असून सदर आदेशान्वये दिलेल्या कार्यक्रमानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरक्षित प्रभागांची जाहीर सोडत दि. ....... रोजी काढण्यात आली व प्रभागनिहाय आरक्षण प्रसिध्द करुन त्यावर दि. ....... ते .......... या कालावधीमध्ये हरकती व सूचना मागविण्यात आल्या.

आणि त्याअर्थी; मी ...............आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यासंदर्भात प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा काळजीपूर्वक विचार करुन राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचना क्र. .................. दि. ............ अन्वये ............ महानगरपालिकेच्या संदर्भात शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या निवडणूक प्रभागांमध्ये पुढील सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनार्थ खालीलप्रमाणे आरक्षण अधिसूचित करीत आहे :-

### एकूण जागांचा तपशील.

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी महिलांकरिता आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | | |
| २ | अनुसूचित जमाती | | |
| ३ | सर्वसाधारण | | |
| | एकूण | | |

### प्रभागनिहाय आरक्षणाचा तपशील.

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | आरक्षण |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

ठिकाण

दिनांक

आयुक्त,

बृहन्मुंबई महानगरपालिका.

# परिशिष्ट – ड

## (सोडत व आरक्षण प्रसिध्दी – जाहीर सूचनेचा नमुना-मराठी)

### महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -------

जाहीर सूचना

**---------- महानगरपालिकेच्या सन ---- मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला) व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढणे, तसेच आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे :-**

| | | |
|---|---|---|
| १ | आरक्षण सोडत दिनांक | वार ---------<br>दिनांक ---------<br>सकाळी ------- वा.<br>स्थळ - ----------<br>------------ |
| २ | आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक | -----वार, दिनांक ------ |
| ३ | आरक्षणाबाबत हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे निवडणूक कार्यालय अथवा संबंधित प्रभाग कार्यालयाचे मुख्यालय येथे सादर कराव्यात) | -----वार, दिनांक --------- ते<br>-----वार, दिनांक ---------<br>(दुपारी ३.०० वा.पर्यंत) |
| | | |

**ठिकाण :-------------** **आयुक्त,**

**दिनांक :-------------** **--------महानगरपालिका**

परिशिष्ट - इ

(सोडत व आरक्षण प्रसिध्दी - जाहीर सूचनेचा नमुना-इंग्रजी)

**--------------------- MUNICIPAL CORPORATION**

**GENERAL ELECTION ------------- (Year)**

**PUBLIC NOTICE**

**For the General Election of ---------------------- Municipal Corporation to be held in the year ----------,The Programme for the Draw of lots for reservation of seats in the category of the Scheduled Caste (women), Scheduled Tribes (women) & Women from General Category and for the publication of reservation is as below.**

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of the Draw for the reservation | Date -----------<br>At --------- a.m<br>Place ---------------------<br>----------------------<br>--------------------- |
| 2 | Date of publishing the draft of reservation | --------day, Date – --------------- |
| 3 | Last date of submitting Objections & Suggestions on reservation (To be submitted to The Municipal Commissioner for Objections & Suggestion, in Election Office or concerned ward Office) | ----------day, Date-----------------<br>to<br>----------day,Date------------------<br>(upto 3.00 p.m.) |
| | | |

**Place :-** **Commissioner,**

**Date :** **------------Municipal Corporation**